# उच्च न्यायालय, मुंबई
# शिपाई/हमाल पदाकरीता निवड प्रक्रिया २०२३

**वाचा :—** १) मुंबई उच्च न्यायालय, मुख्यालय, मुंबई यांच्या आस्थापनेवरील "शिपाई/हमाल" पदाची जाहिरात दिनांक २१/०३/२०२३.

२) उच्च न्यायालय, मुंबईच्या अधिकृत संकेतस्थळावर "शिपाई/हमाल" पदाच्या लेखी परिक्षेस पात्र ३३२४ उमेदवारांची प्रसिद्ध करण्यात आलेली यादी दिनांक २३/०४/२०२४.

## सूचना

माननीय उच्च न्यायालय, मुख्यालय मुंबईच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली यादी दिनांक २३/०४/२०२४ च्या अनुषंगाने, उच्च न्यायालय, मुंबई, मुख्यालय मुंबईच्या आस्थापनेवरील **"शिपाई/हमाल"** पदाच्या लेखी परीक्षेस पात्र झालेल्या **३३२४ उमेदवारांना** असे सूचित करण्यात येत आहे की, ''शिपाई/हमाल'' या पदाकरिता नियोजित केलेल्या लेखी परीक्षेसाठी (Screening Test) **इंडियन एज्युकेशन सोसायटी, राजा शिवाजी विद्यासंकुल, सर भालचंद्र रोड, हिंदु कॉलनी, दादर (पूर्व), मुंबई—४०० ०१४** या स्थळी **दिनांक ५ मे, २०२४** रोजी स्वखर्चाने उपस्थित रहावे.

वरील नमूद उमेदवारांनी सदर परीक्षेसाठीचे प्रवेशपत्र (Hall Ticket/Admit Card) मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावरून **https://bombayhighcourt.nic.in दिनांक ०२/०५/२०२४ रोजी सकाळी ११.०० पासून** डाउनलोड करावे व परीक्षेच्यावेळी सोबत आणावे. उमेदवारांची सदर परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ व परीक्षा आसन क्रमांक संबंधित उमेदवारांच्या प्रवेशपत्रात नमुद केला जाईल. तरी उमेदवारांनी त्यांच्या प्रवेशपत्रात नमूद केलेल्या वेळेनुसार वरील परीक्षा केंद्रावर दिनांक **५ मे, २०२४** रोजी उपस्थित रहावे.

**सही/—**
**(सत्यनारायण रा. नावंदर)**
**प्रबंधक (कार्मिक)**

**दिनांक : ३० एप्रिल, २०२४**